15 NOV 2018 Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Soon, city to house cyber security resource centre

## SUK Beat Many Other Varsities In The Race

Piyush.Bhusari@timesgroup.com

**FEATURES OF THE CENTRE**



- Will offer safety audit services, teachers' training and awareness workshops on cyber security
- Students, teachers, research scholars, and laymen will get benefits from the centre
- ₹7 crore grant has been approved by the MHRD
- Many academic institutions across the country were in race for the establishment of the centre

**Kolhapur:** The country's first National Resource Centre in Cyber Security and Data Sciences will be housed at Shivaji University, Kolhapur (SUK). Training will be offered in cyber security for both government and the corporate sectors, and this trained manpower would also offer cyber safety audit, said RK Kamat, Director, Internal Quality Assurance Cell (IQAC), SUK.

Kamat said training will be given under the Pandit Madan Mohan Malaviya National Mission on Teachers and Teaching (PMMMNMTT) scheme and subjects like cyber forensics and cyber evidence will be covered.

"The first batch of the cyber security course will start from November 26. A special web portal has been developed for this. We have got a good response initially, as all the seats have been reserved for the training," Kamat said.

The resource centre will be useful for offering cyber security and safety audit to government and corporate offices, Kamat said. In September, a presentation regarding this was given to officials of the Union ministry of human resources development, Kamat said.

"There are many cyber security breaches we can witness in our daily lives and our centre will help in making sure these get noticed by the laymen as well as professionals in their respective spaces. This will aid in the knowledge on how to overcome these. It will be useful particularly for agriculture, defence, education, and industries sector," Kamat said.

"An amount of Rs 7 crore has been granted by the HRD ministry and depending on the work, it will be allotted in instalments," he said, adding that Shivaji University, Kolhapur will be offering land for construction of the resource centre and a nod is expected for this at the next management council meeting. The building is expected to come up in a year. Vice-chancellor Devanand Shinde said this would prove a milestone for SUK as it would be the first centre of its kind in the country – several universities were in the race for this, he said.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 NOV 2018
पुण्यनगरी

# पंडित नेहरू यांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात बुधवारी त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र विभागाच्या इमारतीमध्ये विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते पंडित नेहरू यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, डॉ. ए. एम. गुरव, इनोव्हेशन व इनक्युबेशन सेंटरचे संचालक डॉ. आर. के. कामत, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. आर. पी. भणगे यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. नेहरू अभ्यास केंद्रातर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

पुढारी




कोल्हापूर : सैन्यभरतीबाबत आयोजित बैठकीत बोलताना सैन्यभरती अधिकारी कर्नल अनुराग सक्सेना. यावेळी उपस्थित निवासी उपजिल्हाधिकारी संजय शिंदे, डॉ. मेजर गौरव, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर, तहसीलदार गुरू बिराजदार, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर सुभाष सासणे आदी.

# कोल्हापुरात ६ डिसेंबरपासून सहा जिल्ह्यांची सैन्यभरती

## शासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम करावे : निवासी उपजिल्हाधिकारी शिंदे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोल्हापूरसह सहा जिल्ह्यांसाठी दि. ६ ते १६ डिसेंबर या ११ दिवसांच्या कालावधीत कोल्हापूर येथे सैन्य भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या भरती मेळाव्याच्या अनुषंगाने सर्व शासकीय-निमशासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, हा भरती मेळावा यशस्वी करावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी संजय शिंदे यांनी केले. सैन्यभरती कार्यालयाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते.

शिंदे म्हणाले, कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी या सहा जिल्ह्यांसाठी तसेच गोवा राज्यातील पणजी आणि मडगावसाठी दि. ६ ते १६ डिसेंबर या कालावधीत शिवाजी विद्यापीठाच्या मैदानावर ही भरती होईल. या भरतीसाठी आतापर्यंत ३८ हजार तरुणांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे. नोंदणीची अंतिम तारीख २० नोव्हेंबर आहे. या कालाधीतही हजारो तरुण सहभागी होतील, असा अंदाज आहे. सैन्य भरतीची प्रक्रिया सुरळीत, शांततेत आणि सुव्यवस्थेत पार पडावी, या दृष्टीने सर्व संबंधित यंत्रणांनी परस्पर समन्वय ठेवून, त्यांना दिलेल्या जबाबदाऱ्या चोखपणे पार पाडाव्यात, यामध्ये कसल्याही प्रकारे हयगय अथवा टाळाटाळ होता कामा नये, असा इशाराही त्यांनी दिला.

सैन्यभरती मेळाव्याच्या अनुषंगाने यंत्रणांनी करावयाच्या सर्व व्यवस्थांचा सुक्ष्म नियोजन आराखडा तयार करून त्यानुसार कार्यवाही करावी, भरती मेळाव्याच्या ठिकाणी बॅरेकेटिंग, पोलिस बंदोबस्त, वाहतूक व्यवस्था, आरोग्य, स्वच्छता, वीज पुरवठा, पिण्याचे पाणी, शौचालये, भरती उमेदवारांसाठी अधिकाऱ्यांची निवास व्यवस्था तसेच याप्रसंगी उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांसाठी आवश्यकतेनुसार एस. टी. तसेच के. एम. टी.ची बस सुविधा उपलब्ध करून देण्याची सूचनाही त्यांनी केली.

सैन्यभरतीसाठी येणाऱ्या तरुणांसाठी ज्या व्यक्ती आणि संस्थांना मदत करावयाची आहे, त्यांनी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, महासैनिक दरबार, कसबा बावडा रोड, सर्किट हाऊसजवळ, कोल्हापूर येथे संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले.

बैठकीस सैन्यभरती अधिकारी कर्नल अनुराग सक्सेना, डॉ. मेजर गौरव, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर, तहसीलदार गुरू बिराजदार, राजारामपुरी पोलिस निरीक्षक औदुंबर पाटील, महापालिका आरोग्य विभागाचे मुख्य आरोग्य निरीक्षक डॉ. विजय पाटील यांच्यासह सर्व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## पं. नेहरूंना अभिवादन

कोल्हापूर : भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठातर्फे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते पंडित नेहरू यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीमध्ये नेहरू अभ्यास केंद्रातर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

लोकमत

## दैनंदिनी



- कार्यशाळा : शिवाजी विद्यापीठातर्फे महिला हक्क परिषदेचे आयोजन. स्थळ : वि. स. खांडेकर भाषा भवन, शिवाजी विद्यापीठ परिसर. वेळ : सकाळी ११ वाजता.